Konkan Today, Ratnagiri, Maharashtra, Date: January 9, 2013



SAMSUNG smartphone café
खास रत्नागिरीकरांसाठी सॅमसंग मोबाईलचे नवीन दालन
Shop No. 5, DYS Plaza, Shivaji Nagar, Near Hotel Carnival, Ratnagiri, Ph.:02352-270444



# शिकागो टू कोल्हापूर : गौरी जोग व ईशा जोग मायलेकींचा कथ्थक नृत्याविष्कार

WEDNESDAY, 09 JANUARY 2013 13:29



PREV 1 of 2 NEXT

रत्नागिरी - अमेरिकेत शिकागोसारख्या महानगरात वास्तव्यास असलेल्या पण मातृभूमीसाठी काहीतरी करण्याच्या उर्मीने प्रेरीत झालेल्या गौरी जोग व ईशा जोग या मायलेकींचा कथ्थक नृत्याविष्कार नुकताच कोल्हापूर येथे सादर करण्यात आला. शिकागो टू कोल्हापूर ही संकल्पना डोळ्यासमोर ठेवून हा कार्यक्रम सादर करण्यात आला. गायन समाज देवल क्लबच्या सौजन्याने केशवराव भोसले नाट्यगृहात फ्युजन संकल्पनेतील कथ्थक नृत्याविष्कार सादर करण्यात आला. यावेळी फ्युजनच्या वेगवेगळ्या संकल्पनांवर आधारीत कथ्थक नृत्याचे वेगवेगळे प्रकार व बॅले नृत्याचे अनेक प्रकार रसिकांसमोर सादर करण्यात आले.

अमेरिकास्थित श्रीमती गौरी जोग मूळच्या कोल्हापूरच्या असून, जोग यांनी कथ्थक नृत्याची रितसर तालीम मदन पांडे (नागपूर) श्रीमती ललिता हरदास (नागपूर) व श्रीमती मधुरिता नारंग (मुंबई) यांच्याकडून प्राप्त केली आहे. त्यांनी अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाची कथ्थक नृत्यातील विशारद ही पदवी संपादन केली आहे. श्रीमती जोग या सध्या शिकागोमध्ये असून, तेथेही त्यांनी भारतीय पारंपारिक कलेसाठी इंडियन डान्स स्कूल ही संस्था १९९८मध्ये स्थापन केली असून, या संस्थेमध्ये १००हून अधिक विद्यार्थिनी नृत्याचे शास्त्रशुध्द शिक्षण घेत आहेत. श्रीमती गौरी जोग यांनी शकुंतला, झाशीची राणी, कथ्थक यात्रा, ईस्ट मिट्स वेस्ट आदी संकल्पना नृत्याद्वारे सादर केल्या आहेत. याप्रमाणे इतर कलाकारांसोबत त्यांनी भरतनाट्यम, ओडीसी, मेक्सिकन, अमेरिकन, फ्लेमिंको यासारखी फ्युजन्सही सादर केली आहेत.

जोग कुटुंबिय मूळचे रत्नागिरी तालुक्यातील नांदिवडे गावचे आहेत.

SHARE







